# ANCESTORS | पूर्वज

**सहज राहाल**

**पूजा वैश संकल्पित**

छत्रपती शिवाजी महाराज वास्तुसंग्रहालयाच्या शतकपूर्तीनिमित्त 'पूर्वज' हे प्रदर्शन खास संकल्पित करण्यात आलं आहे. सदर प्रदर्शन अश्या कलाकृती सादर करतं ज्या संग्रहालयाच्या मुलभूत बांधणीस सुसंगत अश्या संस्कृतींच्या गोष्टी सांगतं.

जेव्हा इतिहास काय घडलं होतं ह्यावरुन जाणून घेतला जात नाही, तर तो आठवणींच्या पेटाऱ्यातून उलगडत जातो, तेव्हा कथाकथन हे सामुदायिक सजगता जागृत करण्याचं महत्वाचं साधन ठरतं.

संग्रहालय हे आठवणींचं सामाईक क्षेत्र असून ते समृद्ध स्थानिक तसंच जागतिक संस्कृतींच्या कथा, आणि ऐतिहासिक घटनाक्रमांचा मागोवा घेतं. गेल्या शतकभराच्या कालावधीत, संग्रहालयाने वसाहतवादी भूतकाळ, नव्या राष्ट्राची स्थापना, महायुद्ध, दोन महामाऱ्या आणि त्यांचे पडसाद अनुभवले.संग्रहालयाची वास्तू जनतेसाठी खुली करण्याआधी, ह्या वास्तुचा वापर पहिल्या महायुद्धाच्या आणि स्पॅनिश फ्लू साथीच्या काळात सैनिकी रुग्णालय म्हणून केला गेला होता. संस्था आणि इथल्या प्राचीन, नैसर्गिक आणि आधुनिक इतिहासाच्या संग्रहाची बखर आपल्याला दस्तावेजीकरण कसं केलं जातं, माध्यमांची परस्पर-बांधणी कशी हाताळली जाते, आणि भूतकाळातल्या माहितीचा पेटारा वर्तमानाचं वृत्त कथन करण्यासाठी कसा वापरला जातो ह्याबद्दल सूचित करते.

महामारीच्या पश्चात आपली सामाजिक व सांस्कृतिक जबाबदारी स्वीकारत, संग्रहालय प्रस्तुत करत असलेलं प्रदर्शन आपल्यातील सामुहिक विवेकाला साद घालत वर्तमानातील दंतकथा पडताळून पाहण्याचं आमंत्रण देतं.

आपल्या कलाकृतींतून सहज राहाल पुरातत्वशास्त्राचा रुपकात्मक दृष्टीकोनातून विचार करतात; ज्यात काल्पनिक संस्कृतींच्या उदयास्ताचं मार्गक्रमण लोप पावलेल्या काळात, उत्पत्ती आणि विनाशाबाबदच्या विचारधारांना प्रवृत्त करत, त्यादरम्यानच्या जेही घडलं त्या सारं उलगडून दाखवतात. खोलवरच्या भूतकाळापासून ते दूरवरच्या भविष्यापर्यंतचं एका वेगळ्या विश्वातलं पौराणिक कथासूत्र रहाल इथं गुंफतात. सदर प्रदर्शन ह्या दुव्यांना संग्रहालयाच्या वास्तुत एकत्रितपणे सांधत, त्यास भविष्यातील पुरातत्वशास्त्रीय थडग्यांचं ठिकाण ठरवतात. मानवानंतरच्या संस्कृतीचे अवशेष तपासत अभ्यागत दफनाच्या आभासी भुयारी खोलीत प्रवेश करतात. रेखांकनं, चित्रं, शिल्पं, लेखनाचे नमुने, सादरीकरणं आणि कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यक्रमांच्या संयोगातून, खंडित पुराव्यांपासून काल्पनिक संस्कृतीच्या क्षेत्रापर्यंत, आत्मिक जग आणि मानवानंतरचा घटनाक्रम, ह्या साऱ्यासोबत जतनीकरणास योग्य संचित आकार घेत जातं. ह्या तुकड्यांना जोडत, मागे उरणाऱ्या पारिस्थितिक, मानवीय आणि डिजिटल ठस्यांपासून संग्रहालय हे जगाविषयी, तिथं राहणाऱ्या रहिवास्यांविषयी आणि त्यांच्या धारणांविषयीची गोष्ट सांगणारं ठिकाण बनतं.

छत्रपती शिवाजी महाराज वास्तु संग्रहालयातील रंगीत फलकापासून ‘पूर्वज’ ह्या प्रदर्शनाचा प्रारंभ होतो, हा फलक संग्रहालयात प्रदर्शित केलेल्या पाषाणापासून घडवलेल्या प्राचीन आयुधांच्या तसंच हातातील कुऱ्हाडींच्या पुरातत्वशास्त्रीय अवशेषांच्या सोबतीनं मांडण्यात आला आहे. हा फलक उत्क्रांतीच्या इतिहासाविषयीचं काल्पनिक रेखांकन मांडतो, ज्यात मानवी उत्क्रांतीचे दोन टप्पे मांडत आपले पूर्वज युद्ध लढताना दिसतात, एकात ते पाषाणाची आयुधं सरसावताना दिसतात तर दुसऱ्यात त्यांना धार लावून सज्ज असल्याचं दिसतं. संस्कृतींचं अंतर्दर्शन घडवणारे शोध लागलेले प्रसंग ह्या प्रदर्शनातून आपल्यासमोर मांडले जातात.

सदर प्रदर्शन व्यापक मांडणीशिल्प सादर करतं ज्यात कलाकार राहाल, कुतुहल जागं करणाऱ्या महाराष्ट्रातील इनामगाव येथील हडप्पा पश्चात ताम्र-पाषाण-युगातील उत्खनन क्षेत्र असलेल्या दफनभूमीच्या मीमांसेची अद्भुतगाथा प्रस्तुत करतात. प्रेतांचं उगमस्थान आणि प्राचीन संस्कृतींतील प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेत असलेली त्यांची ओळख, यासोबतच, इतर उत्खनन क्षेत्रांपासून काहीसं विसंगत असं प्रेताचं दफन, हे विषय पुरातत्वशास्त्रज्ञांच्या चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. रहाल एक समांतर वृत्तांत सादर करतात जो तर्कक्षेत्रातील पुरातत्वशास्त्रावरुन प्रेरित होत, मनुष्यजातीच्या नामशेषानंतर येऊ घातलेल्या पिढीभवताली विकसित होतो. दंतकथा, कल्पित वैज्ञानिक वाड्ग्मय, साहित्य, शहरांतील आख्यायिका, पौराणिक

कथा आणि व्हिडिओ गेमस् ह्यांचा संदर्भ घेत, त्यांचा अंतर्भाव करत, रहाल येत्या काळातील मानवजातीवर्णनातील वस्तुचं चित्रण साकारतात. रहाल यांच्या कथांतील उत्खनन क्षेत्र हे अनिश्चित बहुअंगी जीवांना सामावून घेतं; जे टाकून दिलेल्या वस्तू आणि पॉलीयुरेथिन फेसापासून रहाल साकारतात. त्यांचे काळ्या स्प्रेनी रंगविलेले डांबरसदृश्य आकार भूतकाळातील अनावश्यक वस्तूंच्या संचयातून घडवल्यागत भासतात. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रोग्रॅमच्या माध्यमातून ते त्यासारखाच जीव सचेतन करतात, जो निर्जन विस्तीर्ण जंगली भूप्रदेशात भटकत राहतो. त्याच्या हालचाली डिजिटल अल्गोरिदमनी नियंत्रित केल्या असून बाह्य ध्वनिसंवेदनांनी तो उत्तेजित होऊन प्रतिसाद देतो. मानवीय आकलनविषयक अनुभवांपासून फारकत घेत, भविष्यात तग धरण्याविषयीच्या स्वत:च्या पौराणिक कथा ही कृत्रिम मने उत्परिवर्तित आणि निर्माण करतात.

कलाकाराने ‘द बूक ऑफ मिसिंग पेजेस’या पुस्तकात रेखाटलेली चित्रं, काल्पनिक पुरातत्वशास्त्रज्ञा’च्या रोजनिशीशी संबंधित असून ती असंख्य टेराकोटा शिल्पांच्या सोबतीनं मांडलेली आहेत; जी पुरातत्वशास्त्रीय खोदकामाच्या क्षेत्रातील झिजलेल्या दगड-रेतीची नक्कल करतात. सदर रचना एक असं अंतराल प्रस्तुत करते ज्यात विभिन्न क्षणिक क्षेत्रातील कलाकृतींप्रमाणे, काळाचे तुकडे परस्परांवर, सुबक वर्गीकरणापासून दूर जाऊन, कोसळले आहेत. रेखांकनांसोबत, रहाल इतिहासाचा अमर्याद प्रकल्प पेश करतात. आकृत्यांचे जनक म्हणून विचलित पुरातत्वशास्त्रज्ञ, घातपाती कारवाया करणाऱ्याचं किंवा कट-कारस्थानं करणाऱ्याचं रुप धारण करतात, जे त्या विसंगतींना समोर आणतात/त्या विसंगती घडवून आणतात, ज्या संस्कृतींविषयी भाष्य करतात. इतिहासलेखनाची प्रक्रिया कथानकातील ते खुलासे दिग्दर्शित करते, जे ‘उत्क्रांती’आणि ‘विकासा’ची कमान ठरलेल्या वसाहतवादी आणि पाश्चात्य आधुनिक दृष्टिकोनातून मांडलेल्या, असंबद्ध संस्कृतींना आणि सामाजिक इतिहासाला वगळण्याची भूमिका पार पाडतात.

मानववंशशास्त्रज्ञांच्या आणि सांस्कृतिक मानववंशशास्त्रज्ञांच्या सिद्धांतांवरुन प्रेरित लघुलेखांची मालिका, धारणा आणि प्राचीन समुदायांच्या सामाजिक स्तरांबाबतच्या अनेक अर्थसमुहांना दिशा देते. ही लेखमालिका पुरातत्वशास्त्राच्या संकल्पनांपासून ते सत्ताशास्त्राविषयीच्या साऱ्या कल्पनांना एकत्र गुंफत, दंतकथा, अवकाश, आजार, मृत्यू आणि कर्मकांड यांच्याशी जोडते.

सदर प्रदर्शनात इतिहासाचा विचार, व्यक्तिनिष्ठ प्रक्रियेने, तथ्यांची मध्यस्थी स्वीकारत, लक्ष देऊन केलेला दिसतो. काळाची शृंखला पेश करताना, वांशिक अधिपत्य, युद्धं, सामाजिक पदानुक्रम आणि नागरी अशांतता यांवरील लघुदृष्टीस फाटा देत, आपल्या विचार आणि कृतींना दिशा देत, संगोपन, तग धरणं आणि सह-अस्तित्व ह्या निकडीच्या गरजांना प्राधान्य दिल्याचं दिसतं. आपल्या ग्रहासोबतच्या नीतीपूर्ण संमिलनाचा आग्रह धरत, दंतकथांतील वैविध्य आणि समुदायांना जोडणाऱ्या धारणा स्वीकारण्याचं आवाहन इथं केलं जातं. आपण इतिहासाच्या अभ्यासातून काय वेचतो, आपले उत्तराधिकारी कोण असतील आणि आपल्या जगात आपण आपल्यामागे राहतील असे कोणत्या प्रकारचे पूर्वज घडवू पाहतो, ह्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जातात.

- पूजा वैश

JN AF

THE MUSEUM MUMBAI
छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय
C S M V S

SHER-GIL SUNDARAM ARTS FOUNDATION

This project was made possible by the support of The Sher-Gil Sundaram Arts Foundation (SSAF) Installation Art Grant 2019.